| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२०००/२०२२ |
| सरकार -वि-पवनकुमार |
| निशाणी क्र.१३ |

## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची शपथेवर सरतपासणी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | भजनदास डोलन घरत, |
| **वय** | : | ४६ वर्षे, |
| **धंदा** | : | पो.हवा. ब.क्र. ५५२९ |
| **राहणार** | : | बेसा, नागपूर |

## सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती अंजु चिंचोळकर यांचेमार्फत

दिनांक १०.०५.२०२२ रोजी मी पो.स्टे. अजनी येथे नाईक पोलीस शिपाई पदावर तपास पथकात कार्यरत होतो. माझी कर्तव्याची वेळ सकाळी ९.०० ते रात्री ९.०० अशी होती. सदर दिवशी विशेष कोंबींग गस्त होती. त्याचा कार्यकाळ १९.०० ते २३.०० पर्यंत होता. आम्ही कुकडे ले आउट परिसरामध्ये सदर गस्त करीत होतो. त्यावेळी गुप्त बातमीदारामार्फत आम्हाला माहिती मिळाली की एक इसम अंगात आकाशी रंगाचा शर्ट व निळया रंगाची फुलपॅन्ट घातलेला चोरीची लाल रंगाची प्लेझर मोपेडवर फिरत आहे. सदर माहिती मी सोबतच्या कर्मचारी ए.पी.आय. खंडारे, ए.पी.आय. संघर्षी आणि बंडू कळंबे, देवेंद्र, अमोल, अविनाश यांना सांगितली. आम्ही तेथे दोन पंचांना बोलावून त्यांना बातमीतील माहिती दिली. सदर माहितीच्या अनुषंगाने परीसरात त्या इसमाचा शोध घेतला असता कुकडे ले आउट गार्डनजवळ तो दिसून आला. त्याने निळया रंगाची फुलपॅन्ट आणि आकाशी रंगाचा शर्ट घातलेला होता व त्याच्याकडे लाल रंगाची प्लेझर मोपेड होती.

२. आम्ही ताब्यात घेण्याकरीता जात असतांना तो पळून जाण्याचा प्रयत्न करु लागला असता त्याला सोबतच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने ताब्यात घेवून त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव पवनकुमार रामनिवास तिवारी, वय ३० वर्षे, रा. नबाबपुरा, लकडगंज पोलीस ठाणे हद्द असल्याचे सांगितले. त्याला त्याच्या ताब्यातील गाडीबाबतच्या कागदपत्रांची मागणी केली असता त्याने उडवउडवीची उत्तरे दिली. त्याच्या जवळील गाडीची पाहणी केली असता डिक्कीमध्ये एक हत्तीमार चाकू एकूण लांबी ६६ सेमी त्यापैकी पात्याची लांबी ३१ सेमी, मध्यभागी रुंदी ५ सेमी व मुठीची लांबी ३५ सेमी असल्याचे दिसून आले. आरोपीला शस्त्र बाळगण्याच्या परवान्याची विचारणा केली असता त्याच्याकडे परवाना नसल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर पो.हवा.बंडू कळंबे यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा कार्यवाही केली व त्याच्याकडून पंचासमक्ष एक हत्तीमार चाकू व सदर मोपेड जप्त केली. त्यानंतर बंडु कळंबे यांनी पोलीस ठाण्यात येवून आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जवाब मी सांगितल्याप्रमाणे नोंदविला. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे मी त्यास ओळखतो. तसेच मला जप्त चाकू व मोपेड दाखविल्यास मी ओळखू शकतो.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ पी.पी. पात्रीकर यांच्याद्वारा-</u>**

३. तपासी अधिकारी कळंबे साहेबांनी माझा जवाब नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पोलीस जवाबात कोंबींग ऑपरेशनची तारीख १०.०५.२०२२ सांगितली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोंबींग ऑपरेशनला गेलोच नव्हतो म्हणून मी चुकीची तारीख नमुद केली. सदर दिवशी मी पोलीस स्टेशनला कर्तव्यावर हजर होतो किंवा कोंबींग ऑपरेशनला गेलो होतो हे दाखविण्यासाठी कोणतेही दस्त मी सोबत आणले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कोंबींग ऑपरेशनला निघण्यापुर्वी मी स्टेशन डायरीला नोंद घेतली

नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी कोंबींग ऑपरेशनसाठी सदर दिवशी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, तिथे आम्ही आरोपीला पकडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून मोपेड व मोपेडच्या डिक्कीतून हत्तीमार चाकू जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचांसमक्ष घटनास्थळ जप्तीपंचनामा तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ जप्तीपंचनामा कळंबे साहेबांनी पोलीस स्टेशनला तयार केला व पंचांच्या सहया देखील पोलीस स्टेशनलाच घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन आरोपीविरुध्द आज खोटी साक्ष देत आहे. मी माझा जवाब वाचल्यानंतर त्यात चुकीची तारीख नमुद करण्यात आली आहे हे तपासी अधिकारी यांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष त्या दिवशी कोणतीही घटना घडली नाही व आज खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष,

ANAMIKA DEBASHISH BOSE

Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2026.03.11 11:35:28 +0530

**(अनामिका दे. बोस)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक १०.०३.२०२६